प्रवेश सूचना

आप सभी को सूचित करते हुए हर्ष हो रहा है कि महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभांतर्गत आर्य समाज परली द्वारा संचालित **'स्वामी श्रद्धानन्द गुरूकुल महाविद्यालय'** में दि.१५ जून २०१६ से पांचवी कक्षा में उत्तीर्ण छात्रों को छठी कक्षा में प्रवेश दिये जा रहे हैं। परली शहर के वैद्यनाथ मंदिर से २ कि. मी. दूरी पर सुरम्य पर्वतीय प्रदेश में विद्यमान इस शिक्षास्थली में महर्षि दयानन्द आर्ष विद्यापीठ, झज्जर (रोहतक) से संलग्न आर्ष पाठ्यक्रम चलाया जाता है, जिसमें वेद, व्याकरण, संस्कृत साहित्य के साथ ही अंग्रेजी, हिन्दी, मराठी, गणित, विज्ञान आदि विषयों का तज्ज्ञ अध्यापकों के सान्निध्य में अध्यापन होता है। गरीब, अनाथ व होनहार छात्रों को निःशुल्क प्रवेश दिया जाएगा।

अतः अपने बच्चों को सुसंकारित कराने व वेदानुयायी बनाने हेतु प्रवेश दिलावें।

सम्पर्क– आचार्य प्रवीण (८८५५०८०६३२),
विज्ञानमुनि(९९७५३७५७११),डॉ.ब्रह्ममुनि (९४२१९५१९०४)

– विनीत –

जुगलकिशोर लोहिया (प्रधान) | उग्रसेन राठौर (मंत्री) | प्रभुलाल गोहिल (कोषाध्यक्ष)

आर्य समाज परली–वैजनाथ जि. बीड

॥ ओ३म् ॥

माझ्या मराठीचा बोलु कवतिके। परि अमृतातेही पैजेसीं जींके ।
ऐसी अक्षरेंचि रसिकें । मेळवीन ।। (संत ज्ञानेश्वर)

मराठी विभाग

सुभाषित सन्देश

कर्म हाच खरा सोबती

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे, भार्या गृहद्वारि जनः श्मशाने ।
देहश्चितायां परलोकमार्गे, कर्मानुगो गच्छति जीव एकः ।।

अर्थ – (जेंव्हा माणूस मरतो, तेंव्हा) सारे धन-धान्य जमिनीवरच पडून राहते, जनावरे गोठ्यातच उभी राहतात. बायको घराच्या दरवाज्यापर्यंत साथ देते, मित्रजन हे स्मशानापर्यंत येतात, देह हा चितेवर जळून भस्मीभूत होतो. पण जीवात्म्याच्या परलोकमार्गावर जर कोणी सोबत येत असेल तर ते म्हणजे **कर्म** होय. हे एकमेव कर्मच शेवटपर्यंत साथ देते.

दयानंदांची अमृतवाणी

विद्वानांच्या स्वार्थामुळेच जगात अनर्थ

माझे हे काम उपकारक नाही, असे जरी कोणाला वाटले तरी त्यांना त्याला विरोधही करू नये. कारण माझा हेतू कोणाचे नुकसान करावे अथवा कोणाला विरोध करावा हा नसून सत्यासत्याचा निर्णय करावा हा आहे. याचप्रमाणे सर्व लोकांनी न्यायाने वागणे हे अत्यंत उचित आहे. मनुष्याचा जन्म वादविवाद व विरोध करण्यासाठी नसून सत्य-असत्याचा निर्णय करण्यासाठी आहे. या मतमतांतराच्या वितंडवादाने जगामध्ये ज्या अनिष्ठ गोष्टी घडल्या, घडत आहेत व घडतील, त्यांची कल्पना निःपक्षपाती विद्वज्जन करून शकतात.जोपर्यंत मानव जातीमध्ये चालू असलेला एकमेकांविरूद्धचा मिथ्या मतमतांतरांचा वाद संपणार नाही, तोपर्यंत सर्वांना आनंद प्राप्त होणार नाही. जर आपण सर्व माणसे व विशेषतः विद्वान लोक ईर्ष्या व द्वेष सोडून देऊन सत्य -असत्याचा निर्णय करून सत्याचे ग्रहण व असत्याचा त्याग करतील, तर ही गोष्ट मुळीच असाध्य नाही. या विद्वानांमधील विरोधामुळेच सर्व लोक विरोधाच्या जाळ्यात अडकले आहेत. जर हे लोक अपल्याच स्वार्थाचा विचार न करता सर्वांच्या हिताचा विचार करतील तर तात्काळ एकमत होईल.

गुढीपाडवा, आर्यसमाज -परिवर्तन पर्वाचा युगारंभ

– प्राचार्य देवदत्त तुंगार

गुढीपाडवा हा भारतीय संस्कृतीमधील उत्साहाचा उत्सव सण आहे. इ.स. १८७५ साली गुढी पाडव्याच्या दिवशी महर्षी स्वामी दयानंद सरस्वती यांनी काकडवाडी गिरगांव, मुंबई येथे आर्यसमाज या संस्थेची स्थापना केली. राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक परिवर्तन या दोन्ही आघाड्यांचा समन्वय साधून स्वामीजींनी टिळक व आगरकरांच्या 'आधी राजकीय की आधी सामाजिक ?' या वादावर समन्वित तोडगा काढला. स्वामी दयानंदांचे गुरू विरजानंद यांनी १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाला प्रेरणा दिल्याचे सांगितले जाते. फासावर लटकलेल्या शहीद भगतसिंहासारख्या अनेक क्रांतिकारकांना महर्षी दयानंदांनी व त्यांच्या **सत्यार्थ प्रकाश** ग्रंथाने स्फूर्ती व प्रेरणा दिली हा इतिहास आहे. एकीकडे राजकीय स्वातंत्र्याच्या आघाडीवर आर्यसमाजाने जोरकस प्रयत्न सुरू केले, तर दुसरीकडे समाजामधील कालबाह्य रूढी आणि अनिष्ट सामाजिक प्रथा परंपरा यांविरूद्ध बंड पुकारले. स्त्री, शूद्रांना शिक्षण देऊ नये, विधवांचे विवाह होऊ नयेत, बालविवाहच करावेत, पती निधनांनतर पत्नीने सती जावे ह्या रूढी परंपरा समाजात दृढमूल झाल्या होत्या. महर्षी स्वामी दयानंदांनी अस्पृश्यता पाळू नका, स्त्री शूद्रादिकांना ज्ञानाची कवाडे खुली करा. विधवांना विवाह करण्यात यावेत, जातिनिर्मूलनासाठी आंतर जातीय विवाहांना सक्रिय प्रोत्साहन देण्यात यावे, अंधश्रद्धा, जादूटोणा, अंगारे-धुपारे, गंडेदोरे, ताईत यांविरूद्ध आर्य समाजाने व दयानंदांनी सुमारे दीडशे वर्षे सातत्याने समाज प्रबोधन केले आहे. आर्य समाजाने मुलींसाठी शेकडो कन्या गुरूकुले व पाठशाळा स्थापन केल्या. जाती व्यवस्था व त्यातील विषमता व अन्यायांविरूद्ध बंडाचे निशाण फडकावले, आंतर जातीय विवाहांना सक्रिय प्रोत्साहन दिले. समाजातील वंचित उपेक्षित घटकांना सन्मानाचे जिणे दिले.

आर्य समाजाचा कार्यक्रम –

महर्षी दयानंद (१८२४ ते १८८३) यांनी महाराष्ट्रात आर्यसमाजाची स्थापना केली असली तरी आर्यसमाज फोफावला.पूर्वीच्या सर्वात मोठ्या असलेल्या अखंड पंजाब राज्यात व उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश आदी राज्यातही आर्यसमाजाने चांगले बाळसे धरले.

महाराष्ट्रात आर्यसमाजी मंडळीत पंजाबी, सिंधी, मारवाडी, गुजराथी व हिंदी भाषिक अधिक दिसतात. खरे म्हणजे

न्यायाधीश व पत्रकार असलेले श्री गोपाळ हरि देशमुख उर्फ लोकहितवादी, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, कुंटे प्रभृती दयानंदाचे निकट सहकारी होते. महात्मा फुले यांनाही दयानंदांच्या कार्याबद्दल आत्मीयता होती. यामुळेच पुण्यात स्वामीजींची रानडे-फुले प्रभृतींनी हत्तीवरून प्रचंड मिरवणूक काढली. छत्रपती शाहू महाराज यांनी तर **'आपण आर्यसमाजाचे सदस्य आहोत आणि कट्टर वेदाभिमानी आहोत'** अशी स्पष्ट लेखी ग्वाही दिली. शाहू महाराजांनी पत्रमहर्षी हरि सखाराम तुंगार यांना **दयानंद चरित्र** लिहिण्याची प्रेरणा दिली व आर्थिक सहकार्य केले. महर्षी दयानंद सरस्वती यांचे चरित्र आणि कामगिरी हा ग्रंथ तुंगारांनी १९२० साली प्रसिद्ध केला. **आर्यधर्मेंद्र दयानंद सरस्वती** हा ८२ पानी छोटा ग्रंथ ह.स.तुंगारांनी दयानंद जन्मशताब्दी वर्षात (१९२४) प्रसिद्ध केला. पण मराठीत आर्यसमाजी साहित्य एकंदरीत दुर्मिळच आहे. ह.स.तुंगार, लक्ष्मणराव ओगले यांच्यानंतर श्रीपाद जोशी (गांधीवादी कार्यकर्ते व कोशकर) यांनी **समग्र क्रांतीचे अग्रदूत दयानंद** हा ग्रंथ पत्रमहर्षी तुंगारांना अपर्ण केला आहे. असे तुरळक प्रयत्न सोडले व सध्या **लातूर समाचार** (संपादक जडे) तसेच मासिक **वैदिक गर्जना** हे आर्य प्र. सभेचे परळी येथून प्रकाशित होणार प्रकाशन सोडल्यास मराठीत आर्य समाजाचा प्रचार प्रसार करणारे प्रभावी माध्यम नाही.या आनुषंगाने भविष्यात महाराष्ट्रात भाषण व लेखनाच्या माध्यमाने आर्य समाज अधिक सक्रिय होईल, अशी अपेक्षा बाळगू या!

-निरामय, कला मंदिरामागे,
वजिराबाद, नांदेड
मो.९३७२५४१७७७

पर्जन्यवृष्टी यज्ञ - आयोजनासंदर्भात बैठक

सध्या पाण्याच्या अभावी जीवन - मरणाचा प्रश्न उभा आहे. संपूर्ण महाराष्ट्रासह देशातही इतरही कांही राज्यात पाणी प्रश्नाने गंभीर रूप धारण केले आहे. सर्वत्र एकच चिंता आहे, ती म्हणजे पाण्याची ! यास्तव आगामी पावसाळ्यात भरपूर पाऊस पडावा, यासाठी महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेने एकाच वेळी अनेक ठिकाणी **पर्जन्यवृष्टी यज्ञाचे** मोठ्या प्रमाणात आयोजन करण्याचे ठरविले आहे. यासंदर्भात विचार विनिमय करण्यासाठी प्रांतीय सभेने दि. २ मे २०१६ (सोमवार) रोजी स. ११ वा. आर्य समाज परळी-वै. येथे एका व्यापक बैठकीचे आयोजन केले आहे. तरी राज्यातील सर्व आर्यसमाजांचे प्रधान, मंत्री, कोषाध्यक्ष, ज्येष्ठ कार्यकर्ते, सभेचे पदाधिकारी, अंतरंग सदस्य व संरक्षक या सर्वांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सभेतर्फे करण्यात येत आहे. -सभामंत्री

वैचारिक प्रदूषणावर प्रभावी उपाय - वैदिक विचार

–सौ.मालन अनंत रुद्रवार

आजच्या युगात मानवापुढील सर्वात अक्राळ-विक्राळ व महाभयंकर समस्या कोणती असेल तर ती म्हणजे वैचारिक किंवा सांस्कृतिक प्रदूषण होय. या प्रश्नाचे निराकरण कसे करायचे ? याच विवंचनेत बुद्धिप्रामाण्यवादी वर्ग सध्या गुंतलेला आहे. एखाद्या प्रश्नाचे उत्तर शोधायचे म्हणजे त्याचा प्रामुख्याने तीन स्तरावरुन विचार झाला पाहिजे. पहिला राजकीय, दुसरा सामाजिक व तिसरा म्हणजे धार्मिक ! यांपैकी राजकीय प्रकाराबाबत आपल्यासारखी सामान्य व्यक्ती कांहीही करु शकत नाही.

दुसरा प्रकार म्हणजे सामाजिक ! अनेक समविचारी प्रवाहाच्या व्यक्तींचा समूह म्हणजे 'समाज' होय. समाज म्हणजेच संघटन ! आणि हे संघटन होण्यासाठी मुख्य गरज आहे ती म्हणजे धार्मिक किंवा नैतिक विचारांच्या अधिष्ठानाची !

एखादी व्यक्ती कितीही श्रीमंत, बडी असली तरी तिच्या नीतीमत्तेवरुनच त्याची किंमत किंवा सामाजिक दर्जा ठरत असतो. म्हणजेच त्याच्या शुद्ध, पवित्र, सच्छिल चारित्र्यावरच त्याच्या यशाचे मोजमाप अवलंबून असते आणि हे अशा प्रकारचे यश हे अधार्मिक व्यक्तीला मिळूच शकत नाही. धार्मिक याचा अर्थ सांप्रदायिक असा नव्हे! संप्रदाय आणि धर्म यामध्ये फार मोठी तफावत आहे. आज आपल्याला दिसतात ते सर्व पंथ, संप्रदाय(हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती, यहुदी) होत. धर्म म्हणजे मानवधर्म, धर्म म्हणजे परमेश्वराची आज्ञा यथावत पालन करणे. "धर्म म्हणजे आपण इतरांकडून ज्या सुखाची अपेक्षा करतो किंवा जशी वर्तणूक इच्छितो तशी वागणूक आपण इतरांस देणे" होय. हा झाला मानवधर्म! या धर्माचे विवेचन किंवा नियम फक्त वेदांमध्येच आपल्याला सापडतील. वेदनियमांच्या किंवा नैतिक मूल्यांच्या विरुद्ध वागणाऱ्यांची गती काय होते ? याची प्रचिती आपणांस रामायण व महाभारतातील विविध घटना प्रसगांवरून येतेच !

एखाद्या व्यक्तीचे मूल्यमापन ती व्यक्ती किती श्रीमंत आहे, यावर अवलंबून नसून ती समाजात वागते कशी ? त्याचा आचार, विचार, व्यवहार कसा आहे? यावरच अवलंबून असते ! या यशासाठी, नैतिक अधिष्ठानाची गरज

असून ती व्यक्ती धार्मिक देखील असणे आवश्यक आहे. धार्मिक म्हणजे वैदिक अर्थात वेद वचनांचे पालन करणारा! वेद म्हणजे यज्ञीय संस्कृती ! होम हवन करणे, प्रदूषणरूपी भस्मासूरापासून वाचण्यासाठी (वैचारिक, सांस्कृतिक, प्रदूषणाच्या) एकच करावयाचे आहे व ते म्हणजे 'यज्ञ' ! आणि फक्त यज्ञच करुन थांबायचे नाही तर समाजातील अंधश्रद्धा, कुरीती, अधार्मिक चालीरीती यांवर सुद्धा आळा बसावयास हवा. जेणेकरुन आंतरिक (नैतिक) प्रदूषणाचा ही नाश होईल व वैचारिक प्रदूषण ही नष्ट व्हायला मदत मिळेल.

तुम्ही म्हणाल, यज्ञ करायचे म्हणजे काय करायचे? ते आम्हाला कसे शक्य आहे? त्याचा उपयोग तरी काय? आमच्या एकट्याने काय काम होणार आहे ? हो, परंतू थोडे थांबा ! एवढी घाई करु नका किंवा घाबरुन ही जाऊ नका! यज्ञ म्हणजे अश्वमेध किंवा सोमयागच नव्हेत ! जे की तुमच्या एकट्याच्या आवाक्याबाहेरचे आहेत. एकटा माणूस काय करु शकत नाही ? 'थेंबे-थेंबे तळे साचे' या प्रमाणे प्रत्येकाने स्वत:चे कर्तव्य ओळखले तर वातावरण शुद्ध होण्यास मदत होईल. रामायण, महाभारत काळात प्रत्येक घरी दररोज अग्निहोत्र होत असे, त्याशिवाय भोजनच होत नसे!

हे झाले व्यक्तिसंबंधाने ! आता राष्ट्रसंबंधाने पाहू या ! एखाद्या राष्ट्राचे उज्ज्वल यश हे त्याच्या नैतिकतेवर व संस्कृतीवर अवलंबून असते. आणि राष्ट्र म्हणेज कांही एखादी वस्तू नाही. राष्ट्र म्हणजे त्यातील लोक ! राष्ट्राची मान उंचावयाची असेल, तर त्यातील लोक अगोदर सुधारले पाहिजेत किंवा त्यांच्यात वैचारिक बदल घडवून आणला पाहिजे. म्हणजेच वैचारिक क्रांती झाली पाहिजे. हा बदल घडवून आणण्याच्या कामी कायदा किंवा राजकीय व्यवस्थेने कांहीही होणार नाही. त्यासाठी माणसांच्या मनामध्ये व विचारांमध्ये परिवर्तन घडावयास पाहिजे. जसे शिवाजी महाराजांनी सारा महाराष्ट्र जागवून संपूर्ण मुसलमानी राजवट उलथून पाडली. शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेसाठी 'हर-हर महोदव' या एका घोषणेने सर्व जनतेला स्वराज्य या ध्येयाने प्रेरित केले. तद्वतच वैचारिक क्रांतीद्वारेच सांस्कृतिक प्रदूषणाचे सावट दूर करता येईल. फक्त एका ध्येयाने प्रेरित होऊन शिवाजी महाराजांनी अत्याचारी जुलमी मुसलमानी राजवटीपासून लोकांना संरक्षण दिले.

तसेच कार्य आता आर्य कार्यकर्त्यांनी पुढे येऊन करावयास हवे !

आज वैदिक विचारांची समाज व राष्ट्राला फार मोठी गरज आहे. चोहीकडे अज्ञान, अभाव व अन्याय या तीन शत्रूंचे साम्राज्य पसरले आहे. एकीकडे भारतात पौराणिक अंधविश्वास दिवसेंदिवस वाढताहेत. तर दुसरीकडे विदेशात इस्लामिक कट्टरतेचा उन्माद मानवतेचा गळा घोटतोय. तसेच एकीकडे पुरोगामित्वाच्या नावावर नास्तिकता, तर दुसरीकडे आधुनिक विज्ञानाच्या नावावर पाश्चिमात्य कुविचार वाढत आहेत.

या सर्व प्रश्नांवर प्रमुख परिणामकारक चिरस्थायी उपाय म्हणजे वैदिक सिद्धांत होय. स्वामी दयानंदांनी ५ हजार वर्षानंतर आम्हांकरिता विशुद्ध स्वरुपाचे वेदज्ञान दिले. हे वैदिक विचार जसे पूर्वी आवश्यक होते, त्याहून ही त्यांची गरज खऱ्या अर्थाने आज सर्वाधिक आहे. तर चला, आपण सर्वजण मिळून संघटीत होऊन आर्य समाजाच्या माध्यमाने या सर्व प्रकारच्या प्रदूषणांवर आळा घालण्यासाठी तत्पर होऊ या !

-द्वारका, जुना मोंढा
माजलगांव जि. बीड
मो. ९४२३२८७४२५

वार्ता विशेष

विशुद्ध वेदार्थासाठी बोधरात्री वरदान - लक्ष्मण आर्य

थोर महात्मे सामान्य घटना-प्रसगांमुळे जागृत होतात व समाजाला नवी दिशा देण्याचे कार्य करतात. अशा महात्म्यांपैकी महर्षी स्वामी दयानंद हे एक थोर क्रांतिकारी व्यक्तिमत्व होते. वयाच्या चौदाव्या वर्षी मूषकलीला पाहुन खऱ्या ईश्वराविषयी शोध व बोध घेण्याची त्यांची जिज्ञासा जगाला विशुद्ध वेदार्थ देण्यासाठी वरदान ठरली, असे प्रतिपादन प्रांतीय सभेचे वेदप्रचार अधिष्ठाता श्री लक्ष्मणराव आर्य गुरूजी यांनी केले.

परळी येथील आर्य समाजात दि. ७ मार्च रोजी आयोजित ऋषी बोध पर्वानिमित्त आयोजित प्रबोधनपर कार्यक्रमात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी सभाप्रधान डॉ. ब्रह्ममुनिजी हे होते. तर व्यासपीठावर आर्य सभाजाचे मंत्री श्री उग्रसेन राठौर, वैद्य विज्ञानमुनी, माजी सैनिक अमृतमुनिजी आदी उपस्थित होते. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून श्री आर्य यांनी शिवरात्रीला बालक मूलशंकरच्या लहानपणी उंदराने शिवपिंडीवर मांडलेल्या उच्छादाची घटना विषद केली. ते म्हणाले - या घटनेमुळे समग्र विश्वात आध्यात्मिक क्रांती झाली. ईश्वरीय सत्य वैदिक ज्ञानाचा नव्याने उदय झाला. अविद्येच्या काळोखात वावरणाऱ्या

दुनियेला आर्षज्ञानाचा सूर्यप्रकाश मिळाला व शाश्वत सुखाचा मार्ग सापडला. सद्य युगात स्वामीजींच्या अनुयायांनी प्रखरपणे वैदिक विचारांचा अंगिकार करून व्यक्तिगत व सामाजिक प्रगती साधणे ही काळाची गरज आहे, असे ही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात सभेचे प्रधान डॉ. ब्रह्ममुनिजींनी बोधरात्री झाली नसती, तर आपण ईश्वर ज्ञानापासून वंचित राहिलो असतो, असे सांगितले. ते म्हणाले - जन्मजन्मांतरीची महर्षींची ज्ञानसाधना व तपश्चर्या दयानंदांच्या जिज्ञासू वृत्तीमुंळे वैश्विक वेदक्रांती घडविण्यास कारणीभूत ठरली. यामुळे आपणां सर्वांना शाश्वत सुखाची प्राप्ती झाली आहे. प्रारंभी पं. प्रशांतकुमार शास्त्री यांच्या पौरोहित्याखाली झालेल्या यज्ञात यजमान सौ.व श्री यशवंत गुट्टे, सौ.व श्री दयानंद भारती, सौ.व श्री दत्तराव गित्ते सहभागी झाले होते. यानंतर सौ. दीक्षा चव्हाण, डॉ.सौ. हर्षा भायेकर, डॉ.सौ. वीरश्री शास्त्री यांनी भजने सादर केली तर लहान-बालकांनी आपली मनोगते सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सौ.डॉ.अनुराधा काळे यांनी केले, तर सूत्रसंचलन सौ.मनीषा आचार्य यांनी केले.

पांच महाव्रतांच्या पालनाने जीवनाचे कल्याण -डॉ.शिंदे

खरा शिव हा सर्वव्यापक व कल्याणकारी एक ईश्वर असून त्याची उपासना श्रद्धा व भक्तीने केली पाहिजे तसेच अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या पाच महाव्रतांच्या अनुष्ठानाने मानवीय जीवनाचे खरे कल्याण साधते, असे विचार प्रा.डॉ.नरेंद्र शिंदे यांनी मांडले.

सोलापूर येथील आर्य समाजात महर्षि दयानंद बोधदिवस मोठ्या उत्साहात साजर करण्यात आला. त्यानिमित्त **आर्य समाजाच्या दृष्टिकोनातून महाशिवरात्र** या विषयांवर आयोजित व्याख्यान समारंभात डॉ. शिंदे प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. त्यांनी आपल्या व्याख्यानातून उपवास व उपाशी या शब्दातील भेद समजावून सांगितला. सुरूवातीला सकाळी पं. राजवीर शास्त्री यांच्या ब्रह्मत्वाखाली **महापुरूष प्रशंसन यज्ञ** संपन्न झाला. यात सर्वश्री प्रा. एस.बी.क्षीरसागर, ॲड. गुरूदत्त बोरगांवकर, अशोक खत्री, अजित शिवाजी पाटील हे यजमान म्हणून उपस्थित होते. या वेळी शास्त्रीजींनी दयानंदांची बोधरात्री ही जगाला भ्रांतीकडून क्रांतीकडे घेऊन जाणारी एक ऐतिहासिक घटना ठरल्याचे स्पष्ट केले. सौ. गायत्री भोसले, कु.रश्मी, कु. पृथ्वी यांनी भजने सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भाऊसाहेब सुतार यांनी केले तर आदित्य सिद्धालकर यांनी आभार मानले.

निवघा आर्य समाजाचे बांधकाम सुरू- मदतीचे आवाहन

हदगांव तालुक्यातील निवघा (बाजार) येथील आर्य समाजाच्या नूंतन इमारतीचे बांधकाम नुक्तेच सुरू झाले आहे. दि. २५ फेब्रुवारी रोजी १८ बाय ३३ या जागेत पंचायत समितीचे सभापती श्री बाळासाहेब कदम यांच्या हस्ते भूमिपूजन करून पायाभरणी करण्यात आली. तत्पूर्वी पं. सोगाजी घुन्नर यांच्या पौरोहित्याखाली झालेल्या भूमियज्ञात प्रधान श्याम पाटील, उपप्रधान संभाजी कदम, माजी पो.पाटील गोविंदराव कदम, मंत्री धोंडीराम शिंदे, प्रभाकर पाटील, गणेश बोंढारे आदी यजमान म्हणून सहभागी झाले. कार्यक्रमास सर्वश्री बंडू पाटील, कोषाध्यक्ष गणेश मुधाळ, चंदु पाथरकर, दीपक शिंदे, भाऊराव देशमुख, विजय कदम, प्रभाकर कदम, बापुराव शिंदे, सुभाष शिंदे, जाबुवंतराव कदम, सौ. सुलोचना शिंदे आदींची उपस्थिती होती.

जवळपास ३० वर्षांपूर्वी स्थापना झालेल्या या आर्य समाजाने या परिसरात वेदप्रचार, सत्संग, भजन-प्रवचन, श्रावणी पर्व आदी माध्यमाने सामाजिक, धार्मिक व मानवतेच्या संवर्धनाचे कार्य केले आहे. या संस्थेकरिता स्वतंत्र अशा भवनाचा अभाव होता. म्हणूनच गावकरी व आर्य कार्यकर्ते यांनी मिळून इमारत उभी करण्याचे ठरविले. नूतन इमारतीचे बांधकाम सध्या अर्ध्यावर आले आहे. याला पूर्वत्वाकडे नेण्यासाठी दानशूर आर्यजनांच्या आर्थिक मदतींची आवश्यकता आहे. तरी या पवित्र कार्यास सर्वांनी हातभार लावावा, असे आवाहन आर्य समाज, निवघा तर्फे करण्यात आले आहे.

गुंजोटी येथे ऋषिबोधोत्सव साजरा

गुंजोटी (ता.उमरगा) येथील आर्य समाजाच्या वतीने ७ मार्च रोजी ऋषिबोधोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. प्रधान पं. प्रियदत्तजी शास्त्री यांच्या ब्रह्मत्वाखाली विशेष यज्ञ संपन्न झाला. यामध्ये यजमान म्हणून सौ.व श्री ओमप्रकाश शिंदे, सौ.व श्री चंद्रकांत कोरे हे सहभागी झाले होते. यज्ञानंतर प्रांतीय सभेचे भजनोपदेशक पं.प्रतापसिंह चौहान यांनी आपल्या सुमधूर भजनांच्या माध्यमाने उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यानंतर गावातील सामाजिक व परोपकारी कार्यकर्ते श्री बसप्पा म्हाळगे गुरूजी यांचा आर्य समाज गुंजोटी तर्फे प्रधान पं. प्रियदत्तजी शास्त्री, मंत्री राजवीरजी शास्त्री, उपप्रधान म्हाळप्पा

दुधभाते आदींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर आर्य समाजचे ज्येष्ठ कार्यकर्ते व संरक्षक दिनकरराव देशपांडे, सौ. वीरश्री सत्यप्रकाश शिंदे यांचाही सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मान्यवरांनी महर्षी दयानंदाच्या क्रांतिकारी जीवन व कार्यावर विचार मांडले. कार्यक्रमास सर्वश्री काशिनाथराव कदेरे, नारायणराव बेळमकर, कर्णसिंहजी गौतम, मोहनराव पाटील, प्रा. संतोष दुधभाते, महाजन गुरूजी, विश्वनाथ कदेरे, ओमप्रकाश शिंदे आदींसह श्रोते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

प्रा.डॉ. वीरश्री शास्त्री 'सेट' परीक्षा उत्तीर्ण

परळी येथील आर्य समाजाच्या महिला कार्यकर्त्या व स्थानिक वैद्यनाथ महाविद्यालयातील हिंदी विषयाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. वीरश्री वीरेंद्र शास्त्री (आर्य) यांनी नुकतीच सेट ही राज्यस्तरीय प्राध्यापक पात्रता परीक्षा उत्तीर्ण केली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पुणे विभागातर्फे ही परीक्षा घेण्यात येते.या यशाबद्दल सौ. शास्त्री यांचे आर्य समाज परळीच्या साप्ताहिक सत्संगात अभिनंदन करण्यात आले. प्रा. सौ. शास्त्री या वैदिक विद्वान डॉ. वीरेंद्र शास्त्री यांच्या धर्मपत्नी आहेत. प्रांतीय सभा व इतर आर्य समाजाच्या वतीने त्यांचे अभिनंदन !

नांदेडमध्ये प्रधानपदी सौ.तुंगार व मंत्रीपदी पाटील

नांदेड येथील आर्य समाजाची त्रैवार्षिक निवडणूक दि. १३ मार्च २०१६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. प्रांतीय सभेचे उपमंत्री प्रा.देवदत्त तुंगार यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. निवडणूकीची सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन प्रधानपदी प्रा.डॉ.सौ.शारदादेवी तुंगार यांची तर मंत्रीपदी श्री सत्येंद्र पाटील (चिंचोलीकर) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. पदाधिकारी पुढीलप्रमाणे –

प्रधान – डॉ.सौ.शारदा तुंगार

उपप्रधान–१)पं.नारायणराव कुलकर्णी
२) श्रीमती जी.व्ही. मारंपल्ले

मंत्री – सत्येंद्र पाटील (चिंचोलीकर)

उपमंत्री – ॲड.प्रशांत कोकणे

कोषाध्यक्ष – प्रा.विनायकराव तांदळे

पुस्तकाध्यक्ष – दिलीप वैद्य

स.पुस्तकाध्यक्ष–ओमकुमार कुरूडे

आर्यवीर अधिष्ठाता –डॉ.जातवेद पवार

यज्ञव्यवस्थापक– १)संभाजी किरकन
२) सौ.लता पाटील

सभा प्रतिनिधी–१) प्रा.देवदत्त तुंगार
२) सत्यव्रत जिंदम ३) यादवराव भांगे

सल्लागार–सर्वश्रीमधुकरराव खतगांवकर, डॉ.हंसराज वैद्य, डॉ.राजपाल पाटील, डॉ.कर्मवीर आर्य

आर्य समाज लातूरचा वार्षिकोत्सव उत्साहात

लातूर येथील गांधी चौक, आर्य समाजाचा ८१ वा वार्षिकोत्सव दि. २५, २६ व २७ मार्च रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरूकुल कांगडी विद्यापीठ, हरिद्वारच्या वेदविभागातील प्रो.डॉ. दीनदयालजी वेदांलकार हे विद्वान व्याख्याते म्हणून तर ऋषिउद्यान अजमेर येथील भजनगायक पं. भूपेंद्रसिंहजी आर्य हे भजनोपदेशक म्हणून आमंत्रित होते. दररोज सकाळी वैदिक यज्ञ, भजनोपदेश व आध्यात्मिक व धार्मिक विषयांवर प्रवचने तर रात्री सामाजिक, राष्ट्रीय व सामयिक विषयांवर भजन व व्याख्यानांचा कार्यक्रम संपन्न होत असे. कार्यक्रम ऐकण्यासाठी लातूर शहर व परिसरातील ग्रामीण भागातील आर्य कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आर्य समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी श्रोत्यांची भोजन व निवासाची व्यवस्था अत्यंत चांगल्या पद्धतीने केली. दुष्काळ व पाण्याची टंचाई असतांना देखील पदाधिकाऱ्यांनी हा उत्सव घडवून आणल्याबद्दल आर्यजन त्यांचे कौतुक करीत आहेत. हा उत्सव सफल करण्यासाठी प्रधान ॲड. हरिश्चंद्र पाटील, उपप्रधान ओमप्रकाश पाराशर, मंत्री चंद्रभानु परांडेकर यांच्यासह इतरांनी मोठे प्रयत्न केले.

औरादमध्ये हवनाने होळीची आदर्श परंपरा

पू. स्वामी श्रद्धानंदजी सरस्वती (हरिश्चंद्र गुरूजी) यांची जन्मभूमी म्हणून ओळख असलेल्या उमरगा तालुक्यातील औराद (गुं.) या गावात सामूहिक संध्या, हवन व जयघोष करीत होळी हा सण साजरा करण्याची आदर्श परंपरा आजही मोठ्या उत्साहात जोपासली जाते. गावातील मारूती मंदिरसमोरील सार्वजनिक ठिकाणी गावातील पुरूष, युवक व बालकमंडळी गोवऱ्या व लाकडे जमवितात. ते रचून मोठ्या भक्तीभावनेने वैदिक मंत्रांच्या उद्घोषात यज्ञास प्रारंभ करतात. इतर गावांप्रमाणे कोणीही बोंबलत नाही किंवा अश्लील शिव्या वगैरे देत नाहीत. हे कार्य गावातील आर्य कार्यकर्ते श्री गुणवंतराव पाटील, रघुराम गायकवाड, पं.संजय गायकवाड व पदाधिकारी मोठ्या प्रयत्नाने पूर्ण करतात.श्री गुणवंतराव पाटील स्वतःच्या खर्चाने तूप, सामग्री व इतर साहित्य एकत्र करतात व हा आनंदोत्सव साजरा करण्यास गावकऱ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन देतात.पूर्वी हे कार्य पू.हरिश्चंद्र गुरूजी, आचार्य शिवमुनिजी, आण्णाराव पाटील करीत असत. होळी हा सण वैदिक पद्धतीने साजरा करण्याचा आदर्श इतरही गावांनी घ्यावा. याबद्दल त्यांचे अभिनंदन!

आर्य समाज लातूरचा वार्षिकोत्सव उत्साहात

लातूर येथील गांधी चौक, आर्य समाजाचा ८१ वा वार्षिकोत्सव दि. २५, २६ व २७ मार्च रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरूकुल कांगडी विद्यापीठ, हरिद्वारच्या वेदविभागातील प्रो.डॉ. दीनदयालजी वेदांलकार हे विद्वान व्याख्याते म्हणून तर ऋषिउद्यान अजमेर येथील भजनगायक पं. भूपेंद्रसिंहजी आर्य हे भजनोपदेशक म्हणून आमंत्रित होते. दररोज सकाळी वैदिक यज्ञ, भजनोपदेश व आध्यात्मिक व धार्मिक विषयांवर प्रवचने तर रात्री सामाजिक, राष्ट्रीय व सामयिक विषयांवर भजन व व्याख्यानांचा कार्यक्रम संपन्न होत असे. कार्यक्रम ऐकण्यासाठी लातूर शहर व परिसरातील ग्रामीण भागातील आर्य कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आर्य समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी श्रोत्यांची भोजन व निवासाची व्यवस्था अत्यंत चांगल्या पद्धतीने केली. दुष्काळ व पाण्याची टंचाई असतांना देखील पदाधिकाऱ्यांनी हा उत्सव घडवून आणल्याबद्दल आर्यजन त्यांचे कौतुक करीत आहेत. हा उत्सव सफल करण्यासाठी प्रधान ॲड. हरिश्चंद्र पाटील, उपप्रधान ओमप्रकाश पाराशर, मंत्री चंद्रभानु परांडेकर यांच्यासह इतरांनी मोठे प्रयत्न केले.

औरादमध्ये हवनाने होळीची आदर्श परंपरा

पू. स्वामी श्रद्धानंदजी सरस्वती (हरिश्चंद्र गुरूजी) यांची जन्मभूमी म्हणून ओळख असलेल्या उमरगा तालुक्यातील औराद (गुं.) या गावात सामूहिक संध्या, हवन व जयघोष करीत होळी हा सण साजरा करण्याची आदर्श परंपरा आजही मोठ्या उत्साहात जोपासली जाते. गावातील मारूती मंदिरसमोरील सार्वजनिक ठिकाणी गावातील पुरूष, युवक व बालकमंडळी गोवऱ्या व लाकडे जमवितात. ते रचून मोठ्या भक्तीभावनेने वैदिक मंत्रांच्या उद्घोषात यज्ञास प्रारंभ करतात. इतर गावांप्रमाणे कोणीही बोंबलत नाही किंवा अश्लील शिव्या वगैरे देत नाहीत. हे कार्य गावातील आर्य कार्यकर्ते श्री गुणवंतराव पाटील, रघुराम गायकवाड, पं.संजय गायकवाड व पदाधिकारी मोठ्या प्रयत्नाने पूर्ण करतात.श्री गुणवंतराव पाटील स्वतःच्या खर्चाने तूप, सामग्री व इतर साहित्य एकत्र करतात व हा आनंदोत्सव साजरा करण्यास गावकऱ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन देतात.पूर्वी हे कार्य पू.हरिश्चंद्र गुरूजी, आचार्य शिवमुनिजी, आण्णाराव पाटील करीत असत. होळी हा सण वैदिक पद्धतीने साजरा करण्याचा आदर्श इतरही गावांनी घ्यावा. याबद्दल त्यांचे अभिनंदन!

शोक वार्ता स्वा.सै. दत्तराम कदम यांचे देहावसान

निवघा (बा.) ता. हदगांव येथील ज्येष्ठ आर्य समाजी स्वा.सै.श्री दत्तारामजी सीतारामजी कदम यांचे नुकतेच वार्धक्यावस्थेमुळे निधन झाले. मृत्युसमयी ते ९६ वर्षे वयाचे होते. त्यांच्या पश्चात् एक मुलगा, तीन मुली, सून, नातू, नात, पणतू असा विशाल परिवार आहे.

स्व.श्री कदम आर्य विचारांचे कट्टर अनुयायी होते. हैद्राबाद स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी हिरिरीने भाग घेतला व निजामशाही विरूद्ध प्रखर लढा दिला. मातृभूमीच्या रक्षणाचे कार्य त्यांनी कर्तव्यभावनेने केले. म्हणूनच त्यांनी स्वातंत्र्य सैनिकांचे वेतन नाकारले. आपल्या कुटुंबियांना सुसंस्कारित करण्यात व वैदिक धर्मी बनविण्यात ते अग्रणी राहिले. आपले नातू संभाजी पांडुरंग कदम यांना शिक्षणासाठी गुरूकुलला पाठविले होते. याच गुरूकुल स्नातकावर सध्या आर्य समाज निवघाच्या उपप्रधानपदाची धुरा आहे. त्यांच्यावर वैदिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले.

श्री मनोहर माशाळकर यांचे निधन

सोलापूर येथील आर्य समाजाचे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री मनोहरजी माशाळकर यांचे दि. १० मार्च २०१६ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी चतुराबाई, मुलगा, मुलगी, सुन, व नातवंडे असा परिवार आहे.

स्व.श्री माशाळकर हे सुरूवातीला तहसिल कार्यालयात लिपिक पदावर कार्यरत होते. ते प्रामाणिक व कर्तव्यदक्ष कर्मचारी होते.पुढे ते बढती मिळवत तहसिलदार पदापर्यंत पोहोंचले. सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांनी समाजसेवेचे व्रत धारण केले. आर्य समाजाच्या संपर्कात येऊन स्वाध्याय, संत्संग व चिंतनाच्या माध्यमाने ते एक कर्मठ आर्य कार्यकर्ते बनले. या संस्थेच्या विविध उपक्रमात सहभागी होऊन एक क्रियाशील कार्यकर्ता म्हणून ओळख निर्माण केली. याशिवाय गोपालक संघ, जीवदया संघ आणि आर्यसमाजच्या संयुक्त माध्यमाने राबविण्यात आलेल्या अवैध कत्तलखाना बंदीच्या आंदोलनात यांनी मोठी भूमिका बजावली. कायदेविषयक सल्लागार

म्हणून देखील त्यांनी काम केले आहे. बरीच वर्षे आर्य समाजाचे अंतर्गत सदस्य व एक चालते बोलते प्रचारक म्हणूनही त्यांची ख्याती होती. ते सतत संत्संग व इतर कार्यक्रमात सहभागी होत असत. जीवनांच्या अंतिम क्षणापर्यंत त्यांनी गायत्री मंत्राचा जाप केला. अशा एका आर्य सिद्धांतावर दृढ निष्ठा ठेवणाऱ्या प्रामाणिक आर्य कार्यकर्त्याच्या निधनाने आर्य समाज सोलापूर व सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे.

त्यांच्या पार्थिवावर पूर्ण वैदिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. सर्वश्री भाऊसाहेब सुतार, शरद होमकर, उत्तममुनिजी (शरद दोशट्टी), सुभाष गायकवाड, बालाप्रसाद सोनी, राजवीर शास्त्री आदींनी हा अंत्यविधी पार पाडला.

श्री भीमराव मुंडे यांचे निधन

सारडगांव ता. परळी-वै. येथील आर्य समाजाचे कार्यकर्ते श्री रामेश्वर मुंडे यांचे वडील श्री भीमरावजी मुंडे महाराज यांचे दि. २१ मार्च रोजी आकस्मिकरित्या अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ७५ वर्षे वयाचे होते. त्यांच्या मागे पत्नी, सुपुत्र, दोन कन्या, नातवंडे असा परिवार आहे. दिवंगत श्री मुंडे हे वैदिक विचारांबरोबर वारकरी संत साहित्याचेही अभ्यासक होते. ते रामायण कथा देखील सांगत. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. नंतर त्यांच्या घरी लक्ष्मण आर्य व भागवतराव आघाव यांनी मार्गदर्शनाखाली शांतीयज्ञ झाला.

शंकरराव गुट्टे यांना मातृशोक

श्रद्धानंद गुरूकुल आश्रम, परळी येथील शिक्षक श्री शंकरराव गुट्टे यांच्या मातुःश्री श्रीमती वंचळाबाई अंबाजीराव गुट्टे यांचे मांडवा येथे दि. २३ मार्च रोजी पहाटे वार्धक्याने निधन झाले. **जीवेत् शरदः शतम्** । या वेदवचनाप्रमाणे श्रीमती गुट्टे यांनी शताधिक्य (१०२) आयुष्य मिळविले.

त्यांच्या मागे चार मुले, दोन मुली व नातू- पणतू असा विशाल परिवार आहे. जवळपास ५ पिढ्यांना पाहण्याचे भाग्य माताजींना लाभले. सुपुत्र श्री शंकरराव यांनी आपल्या आईची अगदी अंतिम क्षणापर्यंत मनोभावे श्रद्धेने सेवाशुश्रूषा केली. दिवंगत वंचळाबाईच्या पार्थिवावर सायंकाळी ५ वा. अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

श्री शेषरावजी माने यांचे निधन

उदगीर तालुक्यातील हाळी येथील आर्य समाजाचे प्रधान व वैदिक विचारांचे प्रखर अनुयायी श्री शेषरावजी सिद्राम माने यांचे २० मार्च रोजी दु. १ वा. अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ८५ वर्षे वयाचे होते. त्यांच्या पश्चात् पत्नी, चार मुले सर्वश्री डॉ. कमलाकर, गणपत, कल्याण व अविनाश एक कन्या सौ. अनिता रमेश भांबळे, सुना, जावई, नातवंडे असा विशाल परिवार आहे.

श्री माने हे जि.प.शाळेचे शिक्षक, मुख्याध्यापक होते. एक तत्वनिष्ठ आदर्श शिक्षक, प्रामाणिक प्रतिष्ठित नागरिक व स्वाध्यायशील आर्य समाजी कार्यकर्त्ता म्हणून त्यांची हाळी-हंडरगुळीच्या पंचक्रोशीत ओळख होती. ज्ञानदानाचे व्रत धारण करीत त्यांनी अनेक चांगले विद्यार्थी घडविले. शाळेतील मुलांबरोबरच ग्रामवासियांना देखील नीतिमत्तेचे धडे देत ते सर्वांचे मार्गदर्शक बनले. समाजात त्यांचा गुरूजी म्हणून चांगलाच प्रभाव होता. आपल्या कृतिशील जीवनातून त्यांनी प्रेरणेचे एक चालते-बोलते दीपस्तंभ म्हणून नावलौकिक मिळविला. वैदिक विद्वानांच्या सान्निध्यामुळे ते आर्य समाजाकडे आकृष्ट झाले. महर्षी दयानंद प्रतिपादित वेदार्थामुळे त्यांचे जीवनच पालटले. स्व.आचार्य शिवमुनिजी, प्रा.अर्जुनराव सोमवंशी, प्रा.नरेंद्र शिंदे यांच्या प्रेरणेने हाळी गावात आर्य समाजाची स्थापना केली. ५-६ ग्रामस्थांना सोबत करून समाजाकरिता जागा घेतली.यासाठी आपले कुटुंबीय व नातेवाईकांकडून निधी जमविला. या आर्य समाजाने आज एक क्रियाशील संस्था म्हणून चांगलेच रूप धारण केले आहे. सामाजिक योगदानाबरोबरच एक कर्तापुरूष म्हणून त्यांनी कुटुंबाला आर्थिक व वैचारिक दृष्टीने नेहमीच आधार दिला. घरातील सर्व धार्मिक विधी होम हवनानेच होत असत. आध्यात्मिक ग्रंथाच्या स्वाध्याचा छंद त्यांनी मोठ्या श्रद्धेने जोपासला. वयाच्या ८० व्या वर्षी देखील दर्शन ग्रंथ अभ्यासण्यास ते उत्सुक होते.

त्यांच्या पार्थिवावर वैदिक पद्धतीने अंतिम संस्कार करण्यात आले. सर्वश्री पं.नरेंद्र शिंदे, पं.नयनकुमार आचार्य,पं.प्रतापसिंह चौहान,विज्ञानमुनिजी, पं.प्रमोद शास्त्री आदीनीं हा अंत्यविधी पार पाडला. यावेळी गांवातील आर्य कार्यकर्ते व प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वरील दिवगंतांना प्रांतीय सभेची भावपूर्ण श्रद्धाजंली ! सभा त्यांच्या दुःखात सहभागी आहे.

।। कृण्वन्तो विश्वमार्यम् ।।



वेदों की ओर लौटो !

वेद प्रतिपादित मानवीय
जीवन मूल्यों को
जन–जन तक पहुँचाने हेतु
कार्यतत्पर सशक्त एवं समर्थ प्रान्तीय आर्य संगठन

महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा

(पंजीयन-एच. ३३३/र.नं.इ/टी.इ. (७)९६७/१०४९,
स्थापना ५ मार्च १९७७)

– मानवकल्याणकारी उपक्रम –

- 'वैदिक गर्जना' मासिक मुखपत्र
- आर्य समाज दिनदर्शिका
- पू. हरिश्चन्द्र गुरूजी गौरव–'मानवता संस्कार एवं आर्यवीरदल शिविर'
- आर्य कन्या वैदिक संस्कार शिविर
- पातञ्जल ध्यानयोग शिविर
- प्रान्तीय आर्य वीर दल प्रशिक्षण शिविर
- पुरोहित प्रशिक्षण शिविर
- मानव जीवनकल्याण वेद प्रचार (श्रावणी) उपाकर्म अभियान
- स्व. विठ्ठलराव बिराजदार स्मृति विद्यालयीन राज्य. वक्तृत्व स्पर्धा
- सौ. तारादेवी जयनारायणजी मुंदडा विद्यालयीन राज्य.निबंध स्पर्धा
- सौ. कलावतीबाई व श्री मन्मथअप्पा चिल्ले (आनन्दमुनि) महाविद्यालयीन राज्य. वक्तृत्व स्पर्धा
- विद्यार्थी सहायता योजना
- सौ.डॉ. विमलादेवी व श्री डॉ.सु.ब.काले (ब्रह्ममुनि) महाविद्यालयीन राज्य. निबन्ध स्पर्धा
- स्व.पं. रामस्वरूप लोखण्डे स्मृति संस्कृत राज्य प्रतियोगिताएं
- मानवजीवन निर्माण अभियान – विद्यालय व महाविद्यालयों के लिए (वैदिक व्याख्यानमाला)
- शान्तिदेवी मायर स्मृति मानवनिर्माण एवं सेवा योजना
- स्व. भसीन स्मृति एवं मायर गौरव स्वास्थ्य रक्षा एवं चिकित्सा शिविर
- शान्तिदेवी मायर विधवा सहायता योजना
- वैदिक साहित्य भेट योजना
- पंथ–जातिप्रथा निर्मूलन अभियान
- वैदिक साहित्य प्रकाशन योजना
- आपत्कालीन सहायता योजना
- पर्जन्यवृष्टि यज्ञ अभियान
- गौ–कृषि सेवा योजना
- स्वा.सै.श्री गुलाबचंदजी लदनिया गौरव राज्य योगासन प्रतियोगिता
- सौ.धापादेवी गु. लदनिया गौरव राज्य प्राणायाम प्रतियोगिता

आर्य समाज सोलापूर में ऋषिबोधपर्व पर व्याख्यान देते हुए प्रा.डॉ.नरेंद्रजी शिंदे । साथ में हैं वैदिक विद्वान पं. राजवीरजी शास्त्री ।

भालकी में आयोजित मानवता कन्या संस्कार शिविर में कवयित्री श्रीमती इंदूमती सुतार का सम्मान करते हुए संयोजिका । मंच पर हैं आर्य वैज्ञानिक डॉ. श्री बी.एम.मेहेत्रे

आर्य समाज, निघवा (बा.) ता.हदगांव के नये भवन का शिलान्यास करते हुए प्रधान श्री शामसुंदर कदम । साथ में हैं आर्य समाज के पदाधिकारी एवं अन्य कार्यकर्त्तागण।

परिवारों के प्रति सच्ची निष्ठा, सेहत के प्रति जागरुकता, शुध्दता एवं गुणवत्ता, करोंडों परिवारों का विश्वास, यह है एम.डी.एच.का इतिहास जो पिछले ९० वर्षों से हर कसौटी पर खरे उतरे हैं -जिनका कोई विकल्प नहीं। जी हां यही हैं आपकी सेहत के रखवाले -

लाजवाब खाना !
एम.डी.एच. मसाले
हैं ना !



MDH
मसाले
असली मसाले
सच-सच

आर्य जगत् के दानवीर भामाशाह
महर्षि दयानन्द के अनन्य भक्त
महाशय धर्मपालजी

ESTD. 1919

MAHASHIAN DI HATTI LTD.
Regd. Office : MDH House,
9/44 Kirti Nagar, New Delhi-110015.
Ph. : 25939609, 25937987
Fax : 011-25927710
E-mail : mdhltd@vsnl.net
Website : www.mdhspices.com

REG.No. MAHBIL/2007/7493 *Postal No. L/Beed/18/2015-1

सेवा में,
श्री

प्रेषक -
मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा,
आर्य समाज, परली वैजनाथ.
पिन ४३१ ५१५ जि.बीड. (महाराष्ट्र)

यह मासिक पत्र सम्पादक व प्रकाशक श्री मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा द्वारा वैदिक प्रिंटर्स, परली वैजनाथ स्थलपर मुद्रित कर 'महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा' कार्यालय 'आर्य समाज, परली वैजनाथ ४३१ ५१५ जि.बीड (महाराष्ट्र) इस स्थान से प्रकाशित किया।

जीवेत् शरदः शतम् ।

परोपकार, समाजसेवा, वेदप्रचार, शिक्षाप्रसार तथा नागपुर शहर व विदर्भ, म.प्रदेश आर्य समाज की गतिविधियों को बढाने में कार्यतत्पर आदर्श आर्य दम्पती

श्री.पं.सुरेन्द्रपालजी आर्य
(प्रसिध्द भजनोपदेशक व गीतकार, नागपुर)

सौ.करुणादेवी आर्या
(अवकाशप्राप्त मुख्याध्यापिका, मन्त्राणी, महिला आर्य समाज, जरीपटका, नागपुर)

के गौरव में 'वैदिक गर्जना' मासिक का रंगीन मुखपृष्ठ सस्नेह भेंट